## स्टॅम्प ई-चलन

| | | |
|---|---|---|
| जी.आर.एन. नंबर | : | |
| दस्ताचा प्रकार | : | **सौदापावती करारनामा** |
| लिहुन घेणाराचे नांव | : | |
| लिहुन देणाराचे नाव | : | **जैन बिल्डकॉन** |
| मुद्रांक शुल्काची रक्कम | : | रुपये /- |
| दिनांक | : | / /२०२० |

।। श्री ।।

# सौदापावती करारनामा

सदरचा सौदापावती करारनामा मौजे पिंप्राळा शिवारातील जळगांव शहर महानगरपालिका जळगांव व सिटी सर्व्हे यांचे हद्दीतील रहिवासी **''साई यश हाईटस्''** या इमारतीमधील **फ्लॅट जागेचे** सामाईक सुखसोईतील अविभाज्य हिश्याचे वापर हक्कासहची **किंमत रुपये /- अक्षरी रक्कम रुपये मात्रची** तारीख / /२०२० रोजी जळगांव मुक्कामी लिहून दिला असे.

१) ______________________

उ.व. वर्षे, व्यवसाय-

पॅन :

आधार :

२) ______________________

उ.व. वर्षे, व्यवसाय-

पॅन :

आधार :

दोघे रा. ______________________

______________________

} **लिहून घेणार**

**जैन बिल्डकॉन**

PAN - AAOFJ1514E

**तर्फे भागीदार**

**१) श्री. सिध्दार्थ अरविंदकुमार जैन**

उ.व. ४४, व्यवसाय- व्यापार

आधार नंबर : ६८५९ ८०६९ ४०८६

**२) श्री. आकाश अरविंदकुमार जैन**

उ.व. ४१, व्यवसाय- व्यापार

आधार नंबर : ८३०१ १२५९ ९३८१

**३) श्री. मनोजकुमार इंदरचंद सुराणा**

उ.व. ५५, व्यवसाय- व्यापार

आधार नंबर : ८९२२ २५२८ ४५५७

सर्व रा. दुकान नंबर ४४,

सहकारी औद्योगिक वसाहत लि.,

अजिंठा रोड, जळगांव, ता. जि. जळगांव.

**लिहून देणार**

**कारणे सौदेपावती करारनामा लिहून देतोत की,**

**मिळकतीचे वर्णन**

तुकडी जिल्हा जळगांव, पोट तुकडी तालुका जळगांव, पैंकी मौजे पिंप्राळा शिवारातील जळगांव शहर महानगरपालिका व सिटी सर्व्हे हद्दीतील **(विभाग क्रमांक ८/२८०, निवासी सदनिका दर २५,०००/- प्रति चौ.मि.) :-**

**मौजे पिंप्राळा शेत गट नंबर ४७/२ ते ९** यात सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडील पत्र क्रमांक डी.व्ही./जे.एल.जि./३०९० दि.१४/११/१९७५ नुसार व मे. जिल्हाधिकारी साहेब जळगांव यांच्याकडील आदेश क्रमांक आर.बी./एल.एन.ए./एस.आर./५५/७४ दि.२४/०६/१९७६ अन्वये बखळ प्लॉट पाडलेले आहेत. त्या

संपुर्ण प्लॉटस पैकी प्रत नंबर -१ बखळ प्लॉट नंबर ३८ (अडोतीस) याचे ७/१२ उताऱ्या व लेआऊटप्रमाणे क्षेत्र २९५.७० चौ.मि. असून त्यास विस्तारीत सिटी सर्व्हे जळगांव नुसार नगर भुमापन क्रमांक ७७५९ दिलेला असून त्याचे क्षेत्र ३०४.५ चौ.मि. आहे व प्रत नंबर -२ बखळ प्लॉट नंबर ३९ (एकोणचाळीस) याचे ७/१२ उताऱ्या व लेआऊटप्रमाणे क्षेत्र २९३.६६ चौ.मि. असून त्यास विस्तारीत सिटी सर्व्हे जळगांव नुसार नगर भुमापन क्रमांक ७७६२ दिलेला असून त्याचे क्षेत्र ३०६.०० चौ.मि. आहे. सदर प्रत नंबर १ व प्रत नंबर २ या बखळ जागेचे मा.जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख यांचेकडील आदेश क्रमांक न.भु./समिलीकरण/जळगांव दि.०२/०१/२०२० अन्वये सि.स.नं. ७७५९ व ७७६२ याचे करुन त्यास **सि.स.नं. ७७५९ लागलेला असून त्याचे एकूण क्षेत्र ६१०.५० चौ.मि. आहे.**

येणेप्रमाणे प्लॉट जागेवर मे. सहाय्यक संचालक साो.,नगर रचना विभाग जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांचेकडील बांधकाम परवानगी पत्र क्रमांक डीडीएमसीजे/बी/२०१९/एपीएल/००३६०दि. २४/१०/२०१९ अन्वये रहिवासी इमारतीचे बांधकाम सुरु केलेले आहे. सदर इमारतीस **"साई यश हाईटस्"** असे नाव दिलेले आहे. सदर इमारत ही महारेरा अंतर्गत नोंदणीकृत असून त्यांचा नोंदणी क्रमांक **P49900025533** असा आहे. त्या बांधीव इमारतीमधील --

**-------------मजल्यावरील फ्लॅट नंबर .......... (---------------------)**

**बांधीव क्षेत्र चौ.मि.** : ..............................

**कारपेट क्षेत्र चौ.मि.** : ..............................

**यात .........बेडरुम, ........... टॉयलेट एक लिव्हींग रुम, एक किचन रुम असे बांधकाम केलेले आहे.**

सदर इमारती मधील तळ जमीन, पार्कींगची जागा, सेफ्टीक टँक, कंपाऊंडची भिंत, कंम्पाऊंड गेट, इमारतीतील गच्ची पर्यंतचा जिना, लिफ्ट, गच्चीवरील पाण्याची एक टाकी तसेच जमिनी खालील एक पाण्याची टाकी, ओपन डक्ट, तळ मजल्यावरील टॉयलेट, सामाईकातील नळ फिटींग, सामाईकातील इलेक्ट्रीक फिटींग, सामाईकातील सॅनिटरी फिटींग, सदर इमारतीच्या मुख्य भिंती, कॉलम, बीम, छत, तळ जागेवरील सामाईकातील बोअरवेल, त्यावरील इलेक्ट्रीक पंप, म्युनिसिपल पाण्याचे कनेक्शन, इमारतीतील दिवे, लिफ्ट वगैरे हे सर्व फ्लॅट धारकांसाठी सामाईकात वापरासाठी आहे. वरील सर्व सामाईक सुखसोई तुम्हास वापरणेचा हक्क आहे व त्यात तुमचा अविभाज्य हिस्सेराशीने सामाईक हिस्सा आहे. सदर इमारतीचे तळ घरात व तळ मजल्यावर दुचाकी वाहन तळ (पार्कींग) व चार चाकी वाहन तळ (पार्कींग) आहे. सदर पार्कींग ही इमारतीतील फ्लॅट धारकांसाठीच रहावयाची आहे. सदर मिळकतीमध्ये आमचे संपुर्ण खर्चाने इलेक्ट्रीक फिटींग व नळ फिटींग करुन दिलेली असून त्यासाठी लागणारे इलेक्ट्रीक मिटर तुम्ही तुमचे खर्चाने घ्यावयाचे आहे.

**यासी चतु:सिमा :-**

**पुर्वेस** :- ------------------------------------------------------------

**पश्चिमेस** :- ------------------------------------------------------------

**उत्तरेस** :- ------------------------------------------------------------

**दक्षिणेस** :- ------------------------------------------------------------

येणेप्रमाणे वर सविस्तर वर्णन केलेली चतु:सिमेतील फ्लॅट घर जागा आतील दरवाजे, खिडक्या, किचन ओटा, इलेक्ट्रीक फिटींग, नळ फिटींग, फ्लोअरींग वगैरे, सदर फ्लॅट मध्ये केलेल्या इतर सुखसोई तसेच या रहिवासी इमारतीतील वर उल्लेख केल्याप्रमाणे फ्लॅट धारकांसाठी असलेल्या सुखसोईतील अविभाज्य हिश्याचे वापर हक्कासह

व तदंगभुत वस्तुसह लिहून देणार यांना पुर्ण मालकी हक्काने कायम खुश खरेदी देण्याचा आज रोजी सौदेपावतीचा करारमाना केला आहे. **(जिचा उल्लेख यापुढे "मिळकत" असा केलेला आहे.)**

**<u>सदर व्यवहाराचे पोटी लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना खालीलप्रमाणे रक्कम अदा करावयाच्या आहे व राहील.</u> --**

१०% रक्कम बुकींग करते वेळी.

३०% रक्कम आर.सी.सी. स्लॅब पुर्ण झाल्यावर

३०% रक्कम ब्रीक्स वर्क पुर्ण झाल्यावर

२५% रक्कम प्लास्टर झाल्यावर

५% रक्कम खरेदीखताचे वेळी

वर नमुद केले प्रमाणे संपुर्ण रक्कम लिहून देणार यांना अदा करावयाची आहे. तसेच वरील रक्कमे व्यतिरिक्त रजिस्टर खरेदीखत / करारनामा साठीचे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, वकील फी व इतर खर्च + जी.एस.टी.+इले. मिटर व म.रा.वि.मं.डी.पी. खर्च + मेंटेनन्स्पोटी रक्कम लिहून देणार यांना वेगळे अदा करावयाचे आहे.

**सदर सौदेपावतीचे बयाणा पोटी लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना खालील प्रमाणे रक्कम अदा केलेली आहे.**

**बयाणाचा तपशिल :-**

/- (अक्षरी रूपये ------------------------------------------------ मात्रचा)
लिहून घेणार यांनी लिहून देणार भागीदारी फर्मचे नावे
या बँकेचा चेक क्रमांक
दि. / /२०२० रोजीचा दिला तो मिळाला,
तो यात मजरा.

**/- (अक्षरी रूपये मात्र)**

वरील प्रमाणे रक्कम तुमचेपासून मिळालेले आहेत. बाकी राहिलेली रक्कम वर नमुद केलेल्या टप्प्याप्रमाणे तुम्ही वेळोवेळी द्यावयाची आहे व राहील.

**मिळकतीची पाश्र्वभुमी :-**

येणेप्रमाणे संपुर्ण प्लॉट मिळकत ही लिहून देणार यांनी राहुल सिव्हील ॲण्ड मॅकेनिकल कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीकडून म. दुय्यम निबंधक सो, जळगांव-३ याचे कार्यालयात दस्त नंबर ३०३७ दि.२२/१०/२०२० अन्वये विकत घेतलेली आहे. त्यानुसार लिहून देणार यांनी सदर प्लॉट मिळकतीवर योग्य ती परवानगी घेऊन त्यावर रहिवाशी इमारतीचे बांधकाम सुरु केलेले आहे. त्यानुसार सदर मिळकत आज रोजी लिहून देणार यांचे मालकीची व कब्जे उपभोगातील असून लिहून देणार यांनी त्यांचे मर्जीने व स्वखुशीने सदर मिळकत बाबत लिहून घेणार यांना विक्री देण्याचा सौदापावती करारनामा लिहुन देत आहे.

**अटी व शर्ती :-**

**१) कर्ज, चार्ज, बोजा :-**

सदरची मिळकत कोणाकडेही गहाण, दान, तारण, अगर लिज केलेली नाही. सदर मिळकतीवर कोणाचे पोटगी अगर चोळी - बांगडीचा अगर लग्नाचे खर्चाचा बोजा नाही. सदर मिळकतीबाबत लिहून देणार यांनी कोणत्याही कोर्टात अगर कार्यालयात कोणत्याही प्रकारे अंडरटेकींग अगर वचन दिलेले नाही. सदर मिळकतीचा वापर करून लिहून देणार यांनी कोणासही जामीनकीत दिलेली नाही.

**२) सदर व्यवहाराची मुदत :-**

अ) सदर मिळकतीचे खरेदीखत लिहून देणार हे लिहून घेणार यांना सदर मिळकत बाबत भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याचे आत उर्वरीत रक्कम लिहून घेणार यांचेकडून मिळाल्यानंतरच लिहून व नोंदवून देतील.

ब) सदर सौदेपावती करारनाम्यात नमुद अटी व शर्ती नुसार विहीत मुदतीत जर लिहून घेणार यांनी वर नमुद केलेल्या टप्प्यानुसार संपुर्ण रक्कम लिहून देणार यांना देऊन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला नाही तर विहीत मुदतीनंतर पुढील ३(तीन) महिन्यांसाठी लिहून घेणार यांना उर्वरीत रक्कमेवर रेरा कायद्याच्या तरतुदीनुसार व्याज द्यावे लागेल व तशी संपुर्ण रक्कम व्याजासहीत मिळाल्यानंतरच लिहून देणार हे सदर मिळकतीचे खरेदीखत लिहून नोंदवून देतील.

क) तसेच यदाकदाचित विहीत मुदतीनंतर ३(तीन) महिन्यात लिहून घेणार हे लिहून देणार यांना उर्वरीत संपुर्ण रक्कम व्याजासहीत देण्यास असमर्थ ठरल्यास सदरचा सौदेपावती करारनामा आपोआप रद्द झाला आहे असे समजण्यात येईल.

**३) कब्जा :-**

सदर मिळकत ही लिहून देणार यांचे मालकीची व ताब्यात आहे. सबब सदर मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा लिहून देणार हे लिहून घेणार यांना खरेदीखताचे वेळी देतील.

**४) कर :-**

सदर मिळकतीचे खरेदीखता पावेतोचे सर्व सरकारी, निमसरकारी, महानगरपालिका कर, बिनशेतसारा वगैरे सर्व कर भरण्याची जबाबदारी लिहून देणार यांचेवर असून खरेदीखतानंतर ती सर्वस्वी लिहून घेणार यांचेवर आहे व राहील.

५) **मेंटनन्स :-**

रुपये **१,००,०००/- अक्षरी रक्कम रुपये एक लाख मात्र** सदर मिळकतीतील सामाईक सुखसोईचे मेंटनन्स पोटी लिहून घेणार यांनी सदर इमारतीतील सोसायटीचे नावाने बँक खाते सुरु होई पावेतो लिहून देणार भागीदारी फर्मकडे खरेदीखतापुर्वी वेगळी जमा करावयाची आहे व राहील. अथवा सोसायटीच्या नावाने बँक खाते सुरु झाल्यास सदर एक रकमी परतावा रक्कम सोसायटीचे नावे खरेदीखतापुर्वी वेगळी जमा करावयाची आहे व राहील.

६) **पार्कींग :-**

सदर मिळकतीचे तळ मजल्यावर सदर इमारतीतील फ्लॅट धारकांसाठी सामाईकात पार्कींगची व्यवस्था करण्यात आलेली असून तिचा वापर लिहून घेणार यांनी सामाईकात करावयाचा आहे व राहील.

७) **नियम व जबाबदारी :-**

अ) सदरची मिळकत ही मे. जिल्हाधिकारी साहेब, जळगांव, म.आयुक्त साो.,शहर महानगरपालिका, जळगांव, टाऊन प्लॅनिंग जळगांव यांचे हद्दीतील आहे. सबब त्यांचेकडील हुकूम, नियम अटी व शर्ती खरेदीखतानंतर मालक व कबजेदार म्हणून लिहून घेणार यांचेवर बंधनकारक राहतील.

ब) सदर मिळकतीचा वापर लिहून घेणार यांनी इतर भाग धारकांना त्रास होणार नाही अशा रितीने करावयाचा आहे. तसेच सदर इमारतीस धोका निर्माण होईल असे कोणतेही कृत्य / बांधकामात बदल लिहून घेणार यांना करता येणार नाही.

क) सदर इमारतीच्या गच्चीवर सोलर सिस्टीम बसवावयाची असल्यास लिहून देणार यांची लेखी पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे व राहील. लेखी पुर्व परवानगी देण्याचा व नाकारण्याचा तसेच त्याबाबत वेगळा मोबदला घेण्याचा

संपुर्ण हक्क व अधिकार लिहून देणार यांना आहे व राहील.

ड) तापमानात २०° सेल्सिअस पेक्षा जास्त चढ उतारामुळे इमारतीतील / मिळकतीतील अंर्तबाह्य भिंतींना बारीक तडे जाऊ शकतात. अशा परिस्थितीत सदर बांधकामात दोष आहे असे म्हणता येणार नाही. याची संपुर्ण जाणिव लिहून घेणार यांना लिहून देणार यांनी दिलेली आहे.

इ) सदर मिळकतीच्या बाहेरील सामाईक जागेत लिहून घेणार यांनी कोणतेही **कच्चे अगर पक्क्या स्वरुपाचे अतिक्रमण किंवा बांधकाम करता येणार नाही.**

ई) सदरचा व्यवहार हा उभयंतांचे सर्व वंशवारसदार यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

## ८) घोषणा पत्राबाबतची माहिती :-

सदर **"साई यश हाईटस्"** या फ्लॅट सिस्टीम इमारतीबाबत महाराष्ट्र वेश्म मालकी अधिनियम १९७० व महाराष्ट्र वेश्म मालकी नियम १९७२ यांचे तरतुदीनुसार घोषणापत्र अद्यापपावेतो केलेले नाही. तसेच सदर प्लॉट मिळकतीत इतर प्लॉट एकत्रीत करुन सदर मिळकतीचे घोषणापत्र लिहून देणार हे लिहून नोंदवून देतील. त्यास लिहून घेणार यांची मुक्त संमती आहे व राहील.

## ९) महत्वाच्या अटी :-

अ) सदर इमारतीचे मंजुर केलेल्या नकाशात काही बदल झाल्यास सदर मिळकतीच्या जमिनीतील अविभाज्य हिस्सेराशीत काही बदल होऊ शकतो.

होणाऱ्या बदलासह सदर मिळकत खरेदी करणे आपल्याला बंधनकारक आहे व राहील. सदर इमारतीवर भविष्यात जास्तीचा एफ.एस.आय. मिळाल्यास किंवा शिल्लक असलेला एफ.एस.आय. ची मालकी लिहून देणार यांचीच आहे व राहील. यास लिहून घेणार यांची कोणतीही हरकत नसून मुक्त संमती आहे व राहील.

ब) सदरचा सौदा पावती करारनामा काहीही कारणास्तव लिहून घेणार यांना रद्द करावाचा असल्यास ठरलेल्या व्यवहाराच्या १०% रक्कम कपात करण्यात येऊन उर्वरीत रक्कम बिनव्याजी ६ महिन्यांचे कालावधीत टप्या टप्प्याने लिहून घेणार यांना परत करतील. तसेच करावा लागणारा रद्द लेख व त्या अनुषंगाने होणारा संपुर्ण खर्च लिहून घेणार यांनाच करावा लागेल.

**१०)दस्तऐवजाचा खर्च :-**

सदर सौदापावती करारनामा व पुढे होणारे खरेदीखतासाठी लागणारा संपुर्ण खर्च, जसे स्टॅम्प ड्युटी, रजिष्ट्रेशन फी, जी.एस.टी., कॉम्प्युटर व झेरॉक्स चार्जेस, वकील फी व इतर अनुषंगिक खर्च तुम्ही लिहून घेणार यांनी करावयाचा आहे व राहील.

**११)ई-चलन :-**

सदर दस्तासोबत मुंबई स्टँम्प ॲक्ट १९५८ चे सुधारीत तरतुदीनुसार सदर दस्ताची स्टॅम्प फी म्हणून रुपये /- मात्र व दस्ताची नोंदणी फी साठी रक्कम रुपये /- मात्र असे एकत्रीत रुपये /- मात्रचे ई-चलन जोडण्यात आलेले आहे.

येणेप्रमाणे सदरचा सौदेपावती करारनामा लिहून देणार व लिहून घेणार यांनी राजीखुशीने, स्वसंतोषाने, सपूंर्ण अटी शर्ती वाचून, समजून, उमजून,कोणाचेही दडपणास बळी न पडता उभयंतांच्या इच्छेप्रमाणे लिहून दिले व घेतले असे.

..............................

**जैन बिल्डकॉन तर्फे भागीदार**
**श्री. सिध्दार्थ अरविंदकुमार जैन**
**- लिहून देणार नंबर १ -**

..............................

**जैन बिल्डकॉन तर्फे भागीदार**
**श्री. आकाश अरविंदकुमार जैन**
**- लिहून देणार नंबर २ -**

..............................

**जैन बिल्डकॉन तर्फे भागीदार**
**श्री. मनोजकुमार इंदरचंद सुराणा**
**- लिहून देणार नंबर ३ -**

{फ्लॅट नं. ...........}



..........................

**लिहून घेणार नंबर १**

..........................

**लिहून घेणार नंबर २**

**साक्षीदार**

१) ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------ ..................................

२) ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------ ..................................

## -: प्रतिज्ञापत्र :-

सदरचा दस्तऐवज हा भारतीय महाराष्ट्र नोंदणी कायदा १९०८ व त्या अंतर्गत असलेल्या नियमातील तरतुदीनुसारच नोंदणीस दाखल केलेला आहे. सदर दस्तातील संपुर्ण मजकुर, निष्पादक व्यक्ती, साक्षीदार, ओळखदार व दस्तासोबत जोडलेल्या कागदपत्रांची सत्यता दोन्ही पक्षकारांनी तपासली आहे. दस्ताची सत्यता / वैधता कायदेशीर बाबींसाठी दस्त निष्पादक व कबुलीधारक हे स्वत: जबाबदार राहतील. दस्तऐवजासोबत जोडलेले कागदपत्र, घेणार, देणार, कुलमुखत्यार धारक, ओळखदार व्यक्ती इत्यादी बनावट आढळून आल्यास त्याची जबाबदारी निष्पादकांची राहील.

महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ मधील नियम ४४ नुसार सदर दस्तऐवजाची वैधता तपासण्याची जबाबदारी नोंदणी अधिकाऱ्यांची नाही. मालमत्ता हस्तांतरण कायदा १८८२ चे कलम ५५ नुसार दस्तातील नमुद मिळकतीचे टायटल (हक्क) तपासणीची जबाबदारी दोन्ही पक्षकार म्हणजे लिहून देणार व लिहून घेणार यांची आहे. याची जाणीव दस्तातील दोन्ही पक्षकारांना आहे.

दस्तात नमुद मिळकतीबाबत कोणत्याही कार्यालयात अथवा न्यायालयात दावा, वाद, खटला दाखल नाही. तसेच दस्तात नमुद मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयाकडून स्टे ऑर्डर किंवा मनाई हुकूम मिळालेला नाही. याबाबतची समज दस्तातील लिहून घेणार व लिहून देणार यांना आहे.

वरील संपुर्ण मजकुर आम्ही वाचला असून तो आम्हास मान्य व कबुल आहे.

**लिहून देणार**

-----------------------

-----------------------

-----------------------

**लिहून घेणार**

-----------------------

-----------------------

## घोषणापत्र

मी, **श्री. आकाश अरविंदकुमार जैन** उ.व. ४१, व्यवसाय- व्यापार रा. दुकान नंबर ४४, सहकारी औद्योगिक वसाहत लि., अजिंठा रोड, जळगांव, ता. जि. जळगांव याव्दारे घोषित करतो की,

जैन बिल्डकॉन तर्फे भागीदार १) श्री. सिध्दार्थ अरविंदकुमार जैन, उ.व. ४४, व्यवसाय- व्यापार, २) श्री. मनोजकुमार इंदरचंद सुराणा, उ.व. ५५, व्यवसाय- व्यापार, सर्व रा. दुकान नंबर ४४, सहकारी औद्योगिक वसाहत लि., अजिंठा रोड, जळगांव, ता. जि. जळगांव यांनी मला नोंदणीकामी मुखत्यारपत्र लिहून दिले असून, सदरचे नोंदणीकामी मुखत्यारपत्र म. दुय्यम निबंधक सो., जळगांव-२ यांचे कार्यालयात दस्त नंबर           अन्वये दि.    /    /२०२० रोजी नोंदवुन दिलेले आहे.

या मुखत्यार पत्राच्या आधारे मी म.दुय्यम निबंधक सो., जळगांव यांचेकडे सदर दस्त नोंदणीसाठी सादर केला आहे. तसेच निष्पादीत करुन कबुली जबाबही दिला आहे. सदर नोंदणीकामी मुखत्यारपत्र लिहून देणार यांनी रद्द केलेले नाही किंवा नोंदणीकामी मुखत्यारपत्र लिहून देणार व्यक्तींपैकी कोणीही मयत झालेले नाही किंवा अन्य कोणत्याही कारणांमुळे नोंदणीकामी मुखत्यारपत्र रद्दबातल ठरलेले नाही. सदरचे मुखत्यारपत्र पुर्णपणे वैध असुन उपरोक्त कृती करण्यास मी पुर्णत: सक्षम आहे. सदरचे कथन चुकीचे आढळुन आल्यास नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ अन्वये शिक्षेस मी पात्र राहील याची मला जाणीव आहे.

---------------------------------

**श्री. आकाश अरविंदकुमार जैन**
(नोंदणीकामी मुखत्यारपत्र धारक)